RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014–16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक ९] सोमवार, जून ९, २०१४/ज्येष्ठ १९, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक २९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय**

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक ९ जून २०१४

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटिफिकेशन-१/४७४/२०१४.— **ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद-५ च्या उप-परिच्छेद (१) नुसार राज्यपाल, संसद अथवा राज्य विधीमंडळांनी पारित केलेला एखादा विशिष्ट कायदा, अनुसूचित क्षेत्र किंवा राज्यातील तत्सम भाग यांना लागू करू नये अथवा अनुसूचित क्षेत्र किंवा राज्यातील तत्सम भाग यांना, अधिसूचनेत विर्निदिष्टपणे नमूद केलेले अपवाद आणि बदलांच्या अधिन राहून लागू करावा, असे निर्देश जाहीर अधिसूचनेद्वारे देऊ शकतात ;

**आणि ज्याअर्थी,** राज्यातील अनुसूचित क्षेत्रात निम्न मानव विकास निर्देशांक, मागासलेपणा, दुर्गमता, गरिबी दिसून येतात, आणि ज्याअर्थी अनुसूचित क्षेत्राचे सामाजिक निर्देशांक साधारणपणे राज्याच्या सामाजिक निर्देशांकाच्या सरासरीपेक्षा कमी आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ नुसार शासनावर अनुसूचित जमातीचे शैक्षणिक आणि आर्थिक हित विशेष काळजी पूर्वक जोपासण्याचे कर्तव्य सोपविले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे संदर्भावरून, आदिवासी सल्लागार परिषदेने निदर्शनास आणले की, अनुसूचित क्षेत्रात सेवा पुरविण्यातील अडचणी जसे पदे रिक्त राहणे, कर्मचाऱ्यांची कार्यालयातील उपस्थिती कमी प्रमाणात असणे, कर्मचाऱ्यांनी कामात पुरेसा रस न घेणे, कर्मचाऱ्यांना स्थानिक बोलीभाषा अवगत नसणे या असून त्या उपरोक्त बाबत कारणीभूत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त बाबी लक्षात घेवून आदिवासी सल्लागार परिषद, महाराष्ट्र यांनी राज्यपाल यांना अधिसूचनेद्वारे तलाठी, सर्वेक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षक, शिक्षक, आदिवासी विकास निरीक्षक, कृषी सहायक, पशुधन सहायक, परिचारिका आणि गट क व गट ड मधील इतर समकक्ष पदे अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवाराकरिता आरक्षित करण्याची शिफारस केली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी अनुसूचित क्षेत्रामधील देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांच्या (Service delivery) दर्जामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने, अनुसूचित क्षेत्रामधील आदिवासींच्या शैक्षणिक विकासात गती देण्याकरिता, स्थानिक बोलीभाषा आणि संस्कृती च्या ज्ञानाच्या अभावी निर्माण होणारे संदेशवहनाचे प्रश्न सोडविण्यासाठी, अनुसूचित क्षेत्रामधील विविध संस्थांमध्ये कर्मचारीवृंदाच्या

वारंवार गैरहजर राहण्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या हेतूने आणि अनुसूचित क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासीच्या कल्याण आणि प्रगती करिता शासनामार्फत राबविण्यात येणारे महत्त्वाचे कार्यक्रम आणि योजनांच्या अंमलबजावणीच्या दर्जात सुधारणा करण्याकरिता, सरळसेवेने भरण्यात येणारी व या अधिसूचनेच्या जोडपत्रात दिलेली काही विवक्षित पदे अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या स्थानिक उमेदवारांकरिता राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

पुढील अधिसूचना शासकीय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याचा दिनांकापासून अंमलात येईल :—

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद-५, उप परिच्छेद (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे निर्देशित करीत आहेत की, यासंबंधी सध्या अस्तित्वात असलेला कोणताही अन्य कायदा किंवा नियम किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी " महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग) कायदा २००१ (महाराष्ट्र कायदा क्र. ८/२००४) " चा कलम ४ आणि त्यासंबंधी तयार करण्यात आलेले अन्य कोणतेही नियम किंवा आदेश या सुधारणेच्या अधीन राहून लागू होतील की महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित क्षेत्र असलेल्या जिल्ह्यामधील अनुसूचित क्षेत्रामधील या अधिसूचने सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या पदांपैकी सरळसेवेने भरावयाची सर्व पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात यावीत.

परंतु, सदर परिशिष्टात नमूद केलेल्या सर्व पदांपैकी एक तृतियांश पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील महिला उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

**स्पष्टीकरण.**—या अधिसूचनेकरिता " स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार " याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वतः किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत.

## परिशिष्ट

| अनुक्रमांक | पदांचे नाव | | विभाग |
|---|---|---|---|
| १ | तलाठी | . . | महसूल व वन विभाग |
| २ | सर्वेक्षक | . . | महसूल व वन विभाग |
| ३ | ग्रामसेवक | . . | ग्रामविकास विभाग |
| ४ | अंगणवाडी पर्यवेक्षक | . . | महिला व बालविकास विभाग |
| ५ | शिक्षक | . . | शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग किंवा आदिवासी विकास विभाग |
| ६ | आदिवासी विकास निरीक्षक | . . | आदिवासी विकास विभाग |
| ७ | कृषी सहायक | . . | कृषी, दुग्ध विकास, पशुसंवर्धन आणि मत्स्य विभाग |
| ८ | पशुधन सहायक | . . | कृषी, दुग्ध विकास, पशुसंवर्धन आणि मत्स्य विभाग |
| ९ | परिचारिका | . . | सार्वजनिक आरोग्य विभाग |
| १० | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी | . . | सार्वजनिक आरोग्य विभाग. |

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**परिमल सिंह,**
राज्यपालांचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.